# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


११/९/२३
4:45

दिनांक : ११/०९/२०२३

# प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ पासुन मोठया उत्साहात साजरा केला जाणारा गणेश उत्सव शहरातील नागरीकांनी पर्यावरणपुरक पध्दतीने साजरा करावा याकरीता व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात यावी असे निर्देश होते.

मा. आयुक्त, अजीज शेख, उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत, यांचेमार्फत उल्हासनगर शहरातील सर्व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ व नागरीक यांनी गणेश उत्सव पर्यावरणपुरक पध्दतीने साजरा करण्यास उत्तेजना देण्याच्यादृष्टीने यावर्षी सार्व. गणेश उत्सव मंडळ व घरगुती गणेश उत्सव यांचेकरीता गणेश उत्सव पर्यावरणपुरक सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेअंतर्गत सार्व. गणेश उत्सव मंडळ तसेच घरगुती उत्सव साजरा करणा-या नागरीकांनी www.umcmv.in या वेबसाईटवर जावुन त्याठिकाणी उपलब्ध असलेल्या QR Code ओपन करून स्पर्धेकरीता नोंदणी करावयाची आहे. तसेच स्पर्धेमध्ये सहभागी झाल्यानंतर आपल्या गणेश उत्सवाची सजावट, आगमन, विसर्जन मिरवणुक तसेच घेण्यात येणारे विविध उपक्रम याबाबत छायाचित्र अथवा व्हिडीओ शुटींग सदर वेबसाईटवर अपलोड करावयाची आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या सार्व. गणेश उत्सव मंडळांकरीता एकुण रू.१ लाख तसेच घरगुती गणेश उत्सव अंतर्गत सहभागी स्पर्धकांसाठी एकुण रु.१ लाख बक्षिसाची रक्कम ठेवण्यात आली आहे. रु. १ लाख ही बक्षिसाची एकुण रक्कम असुन ती गणपती विसर्जन दिवसनिहाय प्रथम, द्वितीय, तृतीय अशाप्रकारे विभागुन देण्यात येणार आहे.

तरी उल्हासनगर शहरातील सर्व सार्व. गणेश उत्सव मंडळ तसेच नागरीक यांनी पर्यावरणपुरक गणेश उत्सव सजावट स्पर्धेमध्ये मोठया संख्येने सहभागी व्हावे. तसेच गणेश उत्सव पर्यावरणपुरक, प्लास्टीकमुक्त, ध्वनीप्रदुषणमुक्त साजरा करावा.

११/९/२३
(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.